# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र




०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४७६/पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ६/०९/२०१८

## "२०१८ पावसाळी जिल्हा पोलीस क्रिडा स्पर्धाचे समारोपन"

भंडारा :— दि. ०५/०९/२०१८ रोजी माननीय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र, नागपूर श्री. के. एम. मल्लीकार्जुन प्रसन्ना यांचे मार्गदर्शनात पोलीस कवायत मैदानावर भंडारा जिल्हयातील पोलीस क्रिडा स्पर्धेचा समारोप करण्यात आला. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय देशमुख, मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. बनडोपंत बन्सोडे यांचेसह जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी पत्रकार बंधू व पोलीस परिवार मोठया संख्येने असे कार्यक्रमात उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुरुवातीला मनोरंजनात्मक कार्यक्रम म्हणुन लहान मुलाकरीता निंबु चमचा, ५० मिटर. दौड, रस्सा खेच, संगित खुर्ची, या स्पर्धामध्ये मा. पोलीस अधिक्षक मॅडम तसेच बालाघाट येथील अधिकारी, पोलीस महीला कर्मचारी व कर्मचा—यांचे कुटुंबातील व्यक्तीना खेळात समावेश घेतला होता. व रस्सा स्पर्धे मध्ये मा. पोलीस अधिकारी व आमंत्रित पत्रकार यांनी भाग घेवुन स्पर्धेला प्रोत्साहन दिले. इ. स्पर्धा घेण्यात आले. त्यामध्ये सांघीक खेळ हॉकी, फुटबॉल, हालीबॉल, कबड्डी यामध्ये पुरुष पोलीस मुख्यालय भंडारा यांचा प्रथम क्रमांक आलेला आहे. तसेच व्हॉलीबॉल व बास्केट बॉल महिला पोलीस मुख्यालय यांचा प्रथम क्रमांक तर तुमसर उपविभाग मधील पुरुष बॉस्केट बॉल व खो—खो यांनी प्रथम क्रमांक घेतला. तसेच बालाघाट जिल्हा संघ पुरुष व भंडारा संघासोबत व्हॉली बॉल मध्ये मैत्रीपुर्ण सामना झाला. यामध्ये बालाघाटा यांनी प्रथम क्रमांक घेतला आहे. खेळामध्ये बेस्ट अॅथलिट(पुरुष) **महेश नेताम क्यु. आर. टी. पथक भंडारा**, तर महिला बेस्ट **अॅथलिट पुष्पा बोरकर पोलीस मुख्यालय भंडारा जनरल चॅम्पीयनशिप पोलीस मुख्यालय भंडारा**, स्पर्धेचे पंच (रेफ्री) श्री. प्रकाशसिंग सर, राठोड सर व त्यांचे सहकारी यांनी खेळाला नेतृत्व केले. व उत्कृष्ट खेळ खेळणा—यांना शिल्ड व प्रमाणपत्र मा. वरांच्या व रोख रक्कम देवुन गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करतांनी मा. पोलीस अधिक्षक विनीता साहू आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे, सर्वेच क्षेत्रात स्पर्धा असुन स्पर्धेमध्ये टिकायचे असेल तर तनावमुक्त जिवन व सुदृढ शरीर आवश्यक आहे. परीस्थिती नेहमी बदलत असते व त्यानुसार बदलने हे निसर्गप्राप्त असते, स्पर्धे मेहनतीने खेळाडुंनी प्रथम व व्दितीय क्रमांक पटकाविले आहेत. या अनुभवाचा व तयारीचा खेळाडुंना आगामी परीक्षेत्रीय, राज्यास्तरीय व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये उत्कृष्ठ कामगिरी करता येते याचा प्रत्यय जिल्हा पोलीस दलातील खेळाडूनी वारंवार दिला आहे. ज्यामध्ये महिला पोलीस शिपाई माधुरी चामट हीने अॅथलेक्टीक्स मध्ये, पो. शि. अरबाज खॉन हॅन्डबाल, पोलीस नाईक सुरेश रेहपाडे यांनी सन १९९४ व १९९६ मध्ये १५०० मिटर ५००० मध्ये कास्य पदक मिळविले आहे. पो. शि. धुर्वे यांनी राष्ट्रीय स्पर्धामध्ये तायकांडो या खेळात सहभाग घेतलेला आहे.,

महीला पोलीस अर्चना बोंदरे, अश्विनी बोदरे यांनी २०१७ मध्ये महाराष्ट्र पोलीस हॅन्डबाल संघामध्ये रांची येथे कास्य पदक पटकाविले आहे. कर्मचा–यांना खेळाचे महत्व व फायदे सांगुन खेळांडुना अधिका–अधिक प्रोत्साहन करुन खेळाडुचे उत्साह वाढविले. जास्तीत जास्त पो. कर्मचा–यांनी वेळात वेळ काढुन खेळास प्राधान्य दयावे त्यामुळे आपल्या शरीराचा फिटनेस साधता येतो. व्यायामामुळे शरीर तंदुरूस्त राहते. असे आयोजक जिल्हाचे पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी सांगीतले. त्यावेळी उपस्थित असलेले जिल्हयातील पाच उपविभागांचे खेळाडुंनी सदर स्पर्धेत भाग घेतला. पोलीस मुख्यालय, उपविभाग भंडारा, उपविभाग तुमसर, उपविभाग साकोली, उपविभाग पवनी येथील पोलीस पुरुष व पोलीस महीला यांचा समावेश होता.

प्रमुख पाहूणे मा. संजय देशमुख सरांनी महिलांना कायदयाव्द्वारे देण्यात आलेल्या अधिकारा बाबत माहीती दिली. खेळाडूंनी खेळाडू वृतीने खेळ खेळत राहावा. याकरीता शुभेच्छा दिल्या व खेळाडूना मार्गदर्शन केले. दोन जिल्हा महिला अधिकारी उत्कृष्ट पध्दतीने जिल्हा साभांळतात याबाबत कौतुक केले.

यावेळी कार्यक्रमाला उपिस्थत श्री. आशुतोष शेडागे रेंन्ज फारेस्ट ऑफीसर, श्री. श्याम मुगम जनरल मॅनेजर ऑडनन्स फॅक्ट्री जवाहरनगर, श्री. उदय दिव्यांशु कंमान्डट कोब्रा बटालियन –६ भंडारा, श्रीमती एस. एच. राठी सेकंड सिवील ज्युडीशियन मॅजीस्ट्रेट ज्युनीयर लेवल भंडारा, उपविभागीय पोलीस अधिकारी बालाघाट(म. प्र) श्रीमती नितु सिंग, श्री. संतोष पंधारे पोलीस निरीक्षक (म. प्र.,) श्री. एन. श्रीवास पोलीस निरीक्षक (म. प्र.) अनुप कुमार कुमरे जिल्हा कारागृह अधिक्षक भंडारा, अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारा श्री. एस. जे. भट्टाचार्य, अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारा श्री. आर. पी. पांडे, सचिव जिल्हा विधीसेवा प्राधीकरण भंडारा श्री. एम. ए. कोठारी, अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी भंडारा श्री. सचिन भंन्साली, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी श्री. तिक्कस, उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर श्री. साळी पत्रकार बंधू, तसेच पोलीस स्टेशनचे, शाखेचे अधिकारी व कर्मचारी पोलीस कुटुबीय हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाला मा. मुख्य व जिल्हा सत्र न्यायाधिश भंडारा श्री. संजय देशमुख यांच्या हस्ते दिप विझवुन पो. क्रिडा स्पर्धेचे समारोपन केले व कार्यक्रमांच्या समारोपनाचे संचालन सौ. आरती देशपांडे तसेच म. पो. शि. योगिनी नाकतोडे यांनी केले. आभार प्रदर्शन अपर पोलीस अधिक्षक भंडारा रश्मि नांदेडकर यांनी केले.

(जितेंद्र के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.